# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025


Original Article

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील लघु उद्योगाचे महत्त्व


**प्रा. डॉ. अतिश उ. राठोड[1],विनयकुमार विष्णुप्रसाद्जी मालपाणी[2]**

[1]सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय नांदेड

[2]संशोधक विद्यार्थी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**Email:** vinayakvmalpani@gmail.com



**Manuscript ID**: JRD -2025-171047

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 10

Pp. 220-223

October. 2025

**Submitted:** 20 Sept. 2025

**Revised:** 30 Sept. 2025

**Accepted:** 15 Oct. 2025

**Published:** 31 Oct. 2025



**घोषवारा**

*कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात लघु उद्योगाचे योगदान महत्त्वाचे असते. महाराष्ट्र सारख्या प्रगतिशील राज्यात लघु उद्योगाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर स्वरूपाची होत चालली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात भांडवलाची कमतरता असल्यामुळे मोठे उद्योग स्थापन करणे कठीण जाते, त्यामुळे कमीत कमी भांडवलामध्ये लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे प्रामुख्याचे ठरते. त्यामुळे कमी भांडवलामध्ये लघुउद्योग स्थापन करणे शक्य असल्यामुळे, लघुउद्योग महाराष्ट्रासारख्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. ज्या देशाचे आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरळीत असते त्या देशातील लोकांना उच्च प्रकारचे जीवनमान प्रदान होत असते. आर्थिक विकास हा त्या राज्याने स्वीकारलेल्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतो. देशात निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवा उत्पादन, उपभोग आणि वितरण इत्यादी आर्थिक व्यवहाराची व्यवस्थापन व नियंत्रण करण्याच्या प्रक्रियेला अर्थव्यवस्था असे म्हणतात. महाराष्ट्रातील लघुउद्योग अकार्यक्षम आहेत असे अनेकदा संबोधले जाते, परंतु महाराष्ट्रातील लघुउद्योग हे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करून आर्थिक स्थिती उंचावण्याचे काम करतात, त्यामुळे महाराष्ट्रातील लघुउद्योग हे अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो.*



***मुख्य संकल्पना (key words):*** *अर्थव्यवस्था, लघुउद्योग, उद्योगाचे महत्त्व, रोजगार, आर्थिक विकास.*


## प्रस्तावना

जगातील सर्वात वेगवान वाढणाऱ्या अर्थव्यवस्थे पैकी एक असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप हे मिश्र अर्थव्यवस्थेचे आहे. यात खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांना महत्त्व दिले जाते. अर्थ व्यवस्थेला स्थिरता व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी औद्योगीकरणा सोबतच लघु उद्योगाचाही विचार करणे किंबहूना त्यास प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. भारतात प्राचीन काळापासुनच लघु व कुटीर उद्योगाचे विशेष स्थान आहे. रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे, मोठया उद्योगास पूरक व मदतगार ठरून शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून देशाचा संतूलित विकास साध्य करण्यास लघु उद्योग हे महत्त्वपुर्ण भूमिका पार पाडत असतात. या उद्योगाच्या महत्त्वामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून लघु उद्योगाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातच या उद्योगांचा पर्याप्त प्रमाणात विकास करण्याकरीता अनेक उपाय आज महाराष्ट्र सरकारच्यावतीने योजले जात आहे.

## साहित्याचा आढावा

1. **एस. अशोक कुमार (१९२०)** यांनी आपल्या "इंटरप्रेनरियल सक्सेस इन स्मॉल अँड मिडीयम इंटरप्राईजेस" या पुस्तकात उद्योजकाने मागास असलेल्या भागात उद्योग स्थापन करूनती उद्योग वाढवणे असे नमूद केले आहे. उद्योजकता ही एक वैयक्तिक संकल्पना असली तरी त्यातून सामाजिक व राष्ट्रीय भावना निर्माण होते कारण उद्योगातून मिळणारे उत्पन्न उदाहरणार्थ कच्च्या मालाचे मूल्य, कामगार, रोजगार, त्यावर आधारित इतर घटक या सर्वांना यातून उत्पन्न मिळते.


Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रा.डॉ.अतिश उ. राठोड, सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय नांदेड*



**How to cite this article:**

*अतिश उ. राठोड,विनयकुमार विष्णुप्रसाद्जी मालपाणी (2025). महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील लघु उद्योगाचे महत्त्व Journal of Research and Development, 17(10),220-223.*

2. **अरोरा अशोक के. (१९९२)** अशोक अरोरा यांनी त्यांच्या "फायनान्सिंग ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज" या पुस्तकात लघुउद्योगासंदर्भात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ याविषयी सविस्तर चर्चा केलेली आहे.
3. **डॉ. माथुर एस. पी. (२००७)** यांच्या "भारत मे उद्यमिता विकास" या पुस्तकात उद्योगाबाबत सविस्तर मांडणी करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये उद्योगधंद्यांचे स्वरूप, उद्योगांचा विकास कसा करावा, उद्योगधंद्याला लागणारे कौशल्य कशा प्रकारचे असावे, उद्योगधंद्यासाठी लागणारे नेतृत्व उभे करण्यासाठी मार्गदर्शन, लघुउद्योगात घेण्यात येणारे निर्णय, लघुउद्योगात स्वीकारणाऱ्या नवनवीन गोष्टींचाही उल्लेख या पुस्तकात आढळून येतो.
4. **सुरी के. बी. (१९८८)** यांनी आपल्या "स्मॉल स्केल इंटरप्राईजेस इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट दि इंडियन एक एक्सपीरियन" या पुस्तकात भारतीय औद्योगिक व्यवसायात व एकूण भारतीय अर्थव्यवस्थेत लघु उद्योगाचे स्थान व महत्त्व विशद केलेले आहे.
5. **जोशी जयंत (२००१)** जयंत जोशी यांनी आपल्या "व्यवसायिक उद्योजकता" या पुस्तकात लघु उद्योगांचा आढावा घेत विश्लेषण केलेले आहे. ज्यामध्ये लघुउद्योगाचा अर्थ व व्याख्या, लघु उद्योगाचे प्रकार, लघु उद्योगाचे महत्त्व, शासनाचे लघु उद्योगासंबंधीचे ध्येयधोरणे, लघुउद्योग कसा स्थापन करावा याची प्रक्रिया आणि लघु उद्योगाच्या क्षेत्रातील राखीव उत्पादनाच्या घटकाचे सविस्तर विश्लेषण या पुस्तकात आढळून येते.

**संशोधनाचे उद्दिष्टे**

1. लघु उद्योगाचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट करणे.
2. लघु उद्योगाचे अर्थ व प्रकार विषद करणे.
3. मोठ्या उद्योगांना लागणाऱ्या सुट्या भागाची निर्मिती करणे.
4. अल्प गुंतवणुकीत रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था:**

महाराष्ट्र हे विकासाच्या बाबतीत भारतातील सर्वात विकसित राज्य म्हणून ओळखले जाते. देशाच्या राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात सर्वाधिक 20% योगदान देणारे महाराष्ट्र हे भारतातील सर्वात मोठे औद्योगिक राज्य आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची असल्यामुळे यात खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांना महत्त्व दिले जाते. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत समाज हिताची जाणीव ठेवून जलद गतीने विकास साधण्यासाठी लोकांच्या सहभागावर व स्वयंस्पुरतेवर भर देण्यात आलेला दिसून येतो. याचबरोबर अधिकाधिक समाजामध्ये आर्थिक विषमता निर्माण होऊ नये म्हणून आर्थिक केंद्रीकरणावर नियंत्रण प्रस्थापित करण्याकरिता आर्थिक परवाना धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. देशातील महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही विकसित अर्थव्यवस्था असल्यामुळे यात शेती व्यवसाय, हस्तव्यवसाय, कापड गिरणी व्यवसाय, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा या बाबींचा समावेश होतो. महाराष्ट्रात अर्थव्यवस्था शेती व शेती संबंधित उद्योग व्यवसायावर अधिकाधिक असल्यामुळे सेवा क्षेत्र यामध्ये दुर्लभ असल्याचे जाणवते. परंतु सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचे प्रमाण वाढत आहे. उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीच्या साह्याने उदा. लघु उद्योगासाठी लागणारा कच्चामाल, वाहतुकीच्या सुविधा, कुशल व कुशल मनुष्यबळ, भांडवल, इ घटकांद्वारे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था नावारूपाला येत आहे.

**लघुउद्योगांचे स्वरुप :**

प्रथम एक मुद्दा असा लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, प्रस्तुत विवेचनामध्ये 'उद्योग' असा जरी, शब्दप्रयोग केलेला असला तरी तो 'व्यवसायसंस्था' या अर्थाने वापरावयाचा आहे. लघुउद्योग हे त्यांच्या विश्लेषणाप्रमाणे 'लघु' किंवा 'लहान' असतात. परंतु त्यांचे हे 'लहाणपण' कोणत्या संदर्भातील असते, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. स्थूल मानाने, असे म्हणता येईल की, ज्या उद्योगांमधील वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण लहान असते, असे उद्योग लघुउद्योग असतात परंतु 'वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण' हा निकष मानण्याऐवजी, कधीकधी उद्योगात केली जाणारी 'संयंत्र' आणि यंत्रसामग्री यांच्या स्वरुपातील गुंतवणूक' हाच निकष वापरुन लघुउद्योगाचे स्वरूप ठरवले जाते.

**लघु उद्योगाची व्याख्या:**

'ज्या व्यासाय संस्थांच्या संयंत्रे आणि यंत्रसामग्री यांच्यामधील गुंतवणूक १ कोटी रुपयांपर्यंत असते, तसेच सुट्या भागांचे व यंत्रसाहित्याचे उत्पादन करणाऱ्या ज्या सहायक वा पूरक व्यवसाय संस्थांमधील गुंतवणूक ७५ लक्ष रुपयांपर्यंत असते, अशा सर्व व्यवसाय संस्था 'लघुउद्योग' असतात'.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

अर्थात, ही अगदी अलीकडच्या काळात केलेली व्याख्या आहे. गेलेल्या चार दशकांच्या काळात आपल्या नियोजनकारांनी लघुउद्योगांच्या व्याख्यांमध्ये अनेक वेळा बदल केलेले आहेत हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. भांडवली समाग्रीच्या किमती काळाच्या ओघात नेहमीच वाढत असतात. अशा परिस्थितीत, यंत्रसामग्रीच्या संदर्भातील गुंतवणुकीची पैश्याच्या स्वरुपातील एकच कमाल मर्यादा कायम ठेवणे लघुउद्योगाची व्याख्या ठरविण्यासाठी योग्य होणार नाही हा नियोजनकारांच्या निर्णयामागील दृष्टिकोन होता. थोडक्यात लघुउद्योगांच्या बाबतीत भांडवल गुंतवणुकीची एक कमाल मर्यादा घालून दिलेली असते. एखाद्या व्यवसाय- संस्थेत या कमाल मर्यादेपेक्षा अधिक भांडवल गुंतवणूक झाली असेल तर ती व्यवसाय संस्था 'लघुउद्योग' म्हणून मान्य केली जात नाही. भांडवल गुंतवणुकीच्या बाबतील अशी कमाल मर्यादा एकदा घालून दिली की, साहजिकच श्रमाच्या वापराला असलेली संधी वाढते आणि देशातील रोजगारही वाढतो.

**लघु उद्योगांचे प्रकार :**

१) अंशकालीन ग्रामीण लघु उद्योगात खांडसरी कारखाने, साळांची गिरणी या उद्योगांचा समावेश होतो.

२) ग्रामीण भागामध्ये पूर्ण वेळ रोजगार ज्या उद्योगामुळे मिळतो, त्यांना पूर्ण वेळ ग्रामीण लघु उद्योग म्हणतात.

३) अंशकालीन शहरी लघु उद्योगात विटा तयार करणे या उद्योगांचा समावेश होतो.

४) प्रिंटींग प्रेस व शिवणयंत्र या उद्योगांना पूर्ण कालीन शहरी लघु उद्योग म्हणतात.

**महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील लघु उद्योगाचे महत्त्व:**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत लघु उद्योगांना अंत्यत महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगीक विकासात लघु उद्योग यांनी महत्त्वपुर्ण वाटा उचलेला आहे. 18 व्या शतकाच्या मध्यापर्यंत लघु व कुटीर उद्योगाचे स्वरूप हे भारतामध्ये भरभराटीस आलेले होते. जगाच्या बाजारात भारतात निर्माण होणाऱ्या अनेक वस्तुंना, विषेशताः सुती व रेशीम कापड, शाली, गालीचे, जरी काम इत्यादिना विषेश मागणी होती. राष्ट्रपीता म. गांधी व दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्रय दुर करण्यासाठी कुटीर उद्योगावरच भर दिला. आजही या उद्योगांचे भारताच्या आर्थिक विकासात तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे हे पुढील प्रमाणे विशद करता येईल.'

1. **रोजगार निर्मिती :-** देशातील वाढती बेरोजगारी दुर करण्यास लघु व कुटीर उद्योग हे मदतगार साबीत होत असतात. या उद्योगाद्वारे श्रमाचा अधिकाधीक वापर होत असल्यामूळे रोजगाराची पुर्तता ही या उद्योगातून साधता येते. त्यामूळे बेकारीची वाढती समस्या या उद्योगातून दुर होते.
2. **कमी भांडवल:-** मोठ्या उद्योगाच्या तुलनेत लघु उद्योगांना कमी भांडवल लागते व या भांडवलाचा जास्तीत जास्त उपयोग लघु उद्योगधंद्यामध्ये होत असते. म्हणून विकासासाठी लागणाया भांडवलाचा अभाव असल्यामुळे कमी भांडवलात लघु उद्योग स्थापन करता येतो.
3. **मोठ्या उद्योगांना मदत :** मोठ्या उद्योगांना साह्यभूत ठरणारी भूमिका लघु उद्योगधंदे बजावतात. मोठ्या उद्योगांना लागणारे निरनिराळे सुटे भाग लघु उद्योग तयार करतात. (उदा. सायकलचे सुटे भाग, ब्रेक, नट, बोल्टस्, स्क्रू, इ.) सुट्या भागाचे उत्पादन करुन मोठ्या उद्योगांना मदत करतात.
4. **शेतीवरील लोकसंख्येचे ओझे कमी होण्यास मदत** : भारतातील ७० टक्क्यापेक्षा अधिक लोक उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे त्यांचे दरडोई उत्पन्न फार कमी आहे. ग्रामीण भागात लघु उद्योगांची स्थापना केल्यास शेतीत काम करणा-या व्यक्ती लघु उद्योगात काम करु लागतील. यामुळे शेतीवर अवलंबून असण या लोकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.
5. **समतोल प्रादेशिक विकास शक्य:** औद्योगिक क्षेत्रात वाढ व्हावी, यासाठी सरकार प्रयत्न करत असते. त्यासाठी मागास भागामध्ये लघु उद्योगधंदे वाढण्यास प्रोत्साहन देते. कारण लघु उद्योगधंदे वाढल्यामुळे त्यांच्या विकासाची फळे मागास भागातील लोकांना मिळतात. त्यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होऊन समतोलपणा वाढण्यास मदत होते. परंतु महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक समतोल हा प्रश्न समोर आल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि कोकण या भागाच्या तुलनेत मराठवाडा आणि विदर्भामध्ये समतोल विकास होऊ शकला नाही. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भामध्ये लघु उद्योगांचे जाळे विस्तारले तर नक्कीच समतोल विकास होण्यास मदत होऊ शकेल.
6. **पांरपारीक कला - कौशल्याचे जतण :-** स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात निर्माण होणाऱ्या वस्तु देशातच नव्हे तर विदेशातंहीं ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या होत्या. देशातील हे पांरपारीक कौशल्य हे या उद्योगामुळे सुरक्षित राहून याचा वारसा हा पुढेही चालविला जाणे शक्य होते. त्यामुळे अशा उद्योगामुळे पांरपारीक कला-कौशल्याचे एक प्रकारे जतन होते.
7. **आयातीवर फारसे अवलंबून राहावे लागत नाही:** स्थानिक साधन सामुग्री व कच्च्या मालावर लघु उद्योगधंदे चालतात. लघु उद्योगाच्या विकासासाठी परदेशातून कच्चा माल व यंत्रसामुग्री आयात करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे लघु उद्योगाच्या विकास व विस्तारासाठी विदेशी भांडवलदारावर विसंबून राहावे लागत नाही.

8. **लघु उद्योगावर व्यापारचक्राचा परिणाम होत नाही :** औद्योगिक क्रांतीची देणगी म्हणून व्यापारचक्राकडे पाहतात. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळे व्यापारात तेजी किंवा मंदी येत असते. याचा परिणाम मागणी व पुरवठ्यावर होत असतो. पण लघु उद्योगात मागणीप्रमाणे उत्पादन घेतल्यामुळे व्यवसायात तेजी किंवा मंदीला तोंड देणे शक्य होते.
9. **औद्योगिक शांतता :** आर्थिक विकासासाठी औद्योगिक वातावरण योग्य असावे लागते. लघु उद्योगधंद्यात मालक व कामगार एकमेकांच्या प्रत्यक्ष संपर्कात येतात. त्यांच्यातील गैरसमज दूर होऊन औद्योगिक संबंध सुधारतात. त्यामुळे औद्योगिक शांतता निर्माण होते.
10. **आर्थिक समानता आणणे :** संपत्ती व उत्पन्न यांच्यातील तफावत कमी करुन गरीब व श्रीमंत यांच्यातील वाढती दरी कमी करण्यासाठी लघु उद्योगधंदे प्रयत्न करतात. मोठे उद्योग भांडवलशाहीस उत्तेजन देतात. आर्थिक सत्तेचे मुठभर लोकांच्या हातात केंद्रीकरण होते. यामुळे समाजवादी समाज रचनेचे स्वप्न भंग पावते. त्यासाठी लघु उद्योगधंदे मागास भागात काढून गरीबांना रोजगार पुरविता येतो. यामुळे त्यांच्या उत्पन्नात थोडीफार वाढ होते.

**निष्कर्श**

आजच्या औद्योगीकरणच्या विज्ञान व तंत्रज्ञनाच्या युगातही लघू उद्योग हे रोजगार संधी निर्माण करण्यात आघाडीवर आहेत. या उद्योगातून उत्पादीत वस्तु व मालाच्या निर्यातीपासून बरेच परकीय चलन भारताला मिळले आहे. या उद्योगाच्या महत्त्वामुळेच स्वांतत्र्योत्तर काळात भारत सरकारने पंचवार्षीक योजनेच्या माध्यमातून लघू उद्योगांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या उद्योगांची संख्याही वाढतांना दिसते. देशाच्या सतुलीत आर्थिक विकास या उद्योगाच्या मदतीने साधला जात असल्यामुळे महाराष्ट्र सरकारकडून या उद्योगांच्या विकासाकरीता नियोजनाच्या माध्यमातुन प्रयत्न चालविले जातात. त्यामुळे लघू उद्योगांच्या महत्त्वाची सार्वत्रिकता दिसून येते.

**संदर्भ**

1. प्रा-छापखाने कि.रा.- 'औद्योगिक घडण व धोरण' पुणे, क्रॉंटिनेंटल प्रकाशन, पहिली आवृत्ती', प्रकरण ५ः:पृष्ठे ७०-९५, प्रकरण-१५-पृष्ठे ३१२-३३७-
2. डॉ. मंडल, कृषी विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.
3. माहोरे रामदास, 2016, अर्थशास्त्राचे सिध्दांत, साई ज्योती पब्लीकेशन्स, नागपूर.
4. Amarjit singh & A. N. Sadhu: Industrial Economics, Bombay, Himalaya Publishing House, First Edition, 1988.
5. Devine P.J.and Others: An Introducation to Industrial Edonomics, London, George Allen and Unwin Ltd.